## शुद्धीपत्रक - १

## : जाहीर आवाहन :

मुंबई महानगर प्रदेश विकास प्राधिकरण हे कल्याण व अंबरनाथ तालुक्यातील २७ गावांसाठी "विशेष नियोजन प्राधिकरण" होते. शासन राजपत्र दिनांक ३०.०४.२०१६ अन्वये या पैकी १० गावांच्या कल्याण ग्रोथ सेंटरसाठी या प्राधिकरणाची "विशेष नियोजन प्राधिकरण" म्हणून नियुक्ती झाली आहे. व १७ गावे कल्याण डोंबिवली महानगर पालिकेत सामाविष्ट केली आहेत. सदरच्या दोन्ही क्षेत्रामध्ये विकास/बांधकाम करण्यासाठी, महाराष्ट्र प्रादेशिक व नगर रचना अधिनियम, १९६६, अन्वये आवश्यक असणाऱ्या बांधकाम परवानग्या प्राधिकरणाकडून घेणे आवश्यक होते. सदरच्या अधिनियमानुसार परवानगी न घेता केलेला विकास/बांधकाम हे अनधिकृत ठरते. अशा प्रकारे कल्याण अंबरनाथ तालुक्यातील २७ गावांच्या क्षेत्रामधिल परवानग्या न घेता विकास/बांधकाम केलेल्या आतापर्यंत ४९३ इतक्या बांधकामांवर प्राधिकरणाने महाराष्ट्र प्रादेशिक व नगर रचना अधिनियम १९६६ नुसार, कारवाई केली आहे. या संदर्भातील सविस्तर तपशील प्राधिकरणाचे संकेतस्थळ **https://mmrda.maharashtra.gov.in** वर उपलब्ध आहे. अशा सर्व अनधिकृत जाहीर झालेल्या बांधकामावर निष्कासनाची कारवाई प्रगतीपथावर आहे.

२. सर्व नागरिकांना प्राधिकरणामार्फत आवाहन करण्यात येते की, उपरोक्त नमूद परिक्षेत्रामधील कोणत्याही प्रकारच्या सदनिका, गोडाऊन व इतर बांधीव क्षेत्र विकत घेण्यापुर्वी, सदर बांधकामास आवश्यक असणाऱ्या परवानग्या असल्याबाबतची खातरजमा झाल्यानंतरच बांधीव क्षेत्र विकत घेण्याबाबत विचार करावा. सदरची माहिती प्राधिकरणाचे उप प्रादेशिक कार्यालय, अग्निशमन इमारत, बाळकूम, ठाणे दुरध्वनी क्र. ०२२. २५३८८१२२ येथेही उपलब्ध आहे.

**दिनांक : ०२.०८.२०१६**
**ठिकाण : मुंबई**

**सही/-**
**महानगर आयुक्त,**
**मुं. म. प्र. वि. प्राधिकरण.**

# Corrigendum - 1

# : Public Appeal :

**Mumbai Metropolitan Region Development Authority was appointed as "Special Planning Authority" for 27 Villages of Kalyan and Ambernath Tahsil area. Now vide Govt. Gazzate dated 30.04.2016 this Authority has been appointed as "Special Planning Authority" for 10 Villages of Kalyan Growth Centre and 17 villages has been included in Kalyan-Dombivali Municipal Corporation. As per the Maharashtra Region & Town Planning Act, 1966, it was necessary to obtain permission from the Authority for development/construction in both these area. Any development /construction without permission of the Authority is to be treated as "Unauthorized". Accordingly this Authority had initiated action against 493 structures under MR&TP Act, 1966, in the area of 27 Villages of Kalyan and Ambernath Tahsil. Details of these unauthorized structure's are available on the MMRDA's website https://mmrda.maharashtra.gov.in The action of demolition on these unauthorized structure is in progress.**

**2. All the citizens are hereby informed that, before purchasing any constructed Premises, Godown, Shops or any built-up structure within the area stated above, they should confirm that all the required permission has been taken. The said information is also available with Sub-Regional Office, Fire Brigade Building, Balkum, Thane, Tel. No. 022, 25388122.**

**Date : 02.08.2016**

**Place : Mumbai**

**Sd/-**
**Metropolitan Commissioner**
**MMRDA**

# शुद्धीपत्रक - १

## : जाहीर आवाहन :

मुंबई महानगर प्रदेश विकास प्राधिकरण हे भिवंडी परिसर अधिसुचित क्षेत्रातील ६० गावांसाठी "विशेष नियोजन प्राधिकरण" आहे. सदरच्या अधिसुचित क्षेत्रामध्ये विकास/बांधकाम करण्यासाठी महाराष्ट्र प्रादेशिक व नगर रचना अधिनियम, १९६६, अन्वये आवश्यक असणाऱ्या बांधकाम परवानग्या प्राधिकरणाकडून घेणे आवश्यक आहे. सदरच्या अधिनियमानुसार परवानगी न घेता केलेला विकास/ बांधकाम हे अनधिकृत ठरते. अशा प्रकारे परवानग्या न घेता विकास/ बांधकाम केलेल्या आतापर्यंत ४५९ इतक्या बांधकामांवर प्राधिकरणाने महाराष्ट्र प्रादेशिक व नगर रचना अधिनियम, १९६६, नुसार कारवाई केली आहे. या संदर्भातील सविस्तर तपशील प्राधिकरणाचे संकेतस्थळ https://mmrda.maharashtra.gov.in वर उपलब्ध आहे. अशा सर्व अनधिकृत जाहीर झालेल्या बांधकामावर प्राधिकरणामार्फत निष्कासनाची/तोडण्याची कारवाई प्रगतीपथावर आहे.

२. सर्व नागरिकांना प्राधिकरणामार्फत आवाहन करण्यात येते की, प्राधिकरणाच्या उपरोक्त नमूद परिक्षेत्रामधील कोणत्याही प्रकारच्या सदनिका, गोडाऊन व इतर बांधीव क्षेत्र विकत घेण्यापुर्वी, सदर बांधकामास आवश्यक असणाऱ्या परवानग्या असल्याबाबतची खातरजमा झाल्यानंतरच बांधीव क्षेत्र विकत घेण्याबाबत विचार करावा. सदरची माहिती प्राधिकरणाचे उप प्रादेशिक कार्यालय, अग्निशमन इमारत, बाळकूम, ठाणे दुरध्वनी क्र. ०२२. २५३८८१२२ येथेही उपलब्ध आहे.

**दिनांक : ०२.०८.२०१६**
**ठिकाण : मुंबई**

**सही/-**
**महानगर आयुक्त,**
**मुं. म. प्र. वि. प्राधिकरण.**

# Corrigendum - 1

# : Public Appeal :

**Mumbai Metropolitan Region Development Authority is appointed as "Special Planning Authority" for 60 Villages of Bhiwandi Area. As per the Maharashtra Region & Town Planning Act, 1966, it is necessary to obtain permission from the Authority for development/construction in this area. Any development/construction without permission of the Authority will be treated as "Unauthorized". MMRDA has initiated action against 459 structures under MR&TP Act, 1966. The action of demolition on these unauthorized structure is in progress. Details of these unauthorized structure's are available on the MMRDA's website https://mmrda.maharashtra.gov.in**

**2. All the citizens are hereby informed that, before purchasing any constructed Premises, Godown, Shops or any built-up structure within the jurisdiction of these 60 Villages, they should confirm that all the required permission has been taken from M. M. R. D. A. The said information is also available with Sub-Regional Office, Fire Brigade Building, Balkum, Thane, Tel. No. 022, 25388122.**

**Date : 02.08.2016**

**Place : Mumbai**

**Sd/-**
**Metropolitan Commissioner**
**MMRDA**